झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड
क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा./सप्रा-१/२२४ पै./ ४९२ /२०२०
दिनांक : २९ /०८ /२०२०

# झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, सदर स.नं.२२६अ/१/१ पै. येथील कदमवस्ती या नावाने ओळखल्या जाणाऱ्या झोपडपट्टीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. कुमार बेहरे राठी यांचेमार्फत पुणे महानगरपालिकेमध्ये एस.आर.डी. अंतर्गत दि.१६/०८/२००२ रोजी पुणे महानगरपालिका, पुणे या कार्यालयाकडे दाखल केला होता; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे महानगरपालिका, पुणे यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०६/०१/२००० पृष्ठ क्र.३० वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर योजनेची अंतिम पात्रता यादी दि.२५/०५/२००५ रोजी सक्षम प्राधिकारी तथा उपायुक्त (समाजकल्याण), पुणे महानगरपालिका, पुणे यांचेमार्फत करण्यात आली आहे ; आणि

ज्याअर्थी, विषयांकित मिळकतीचा "विमुक्त गलिच्छवस्ती आदेश" दि.०९/०६/२००५ रोजी सक्षम प्राधिकारी तथा उपायुक्त (समाजकल्याण), पुणे महानगरपालिका, पुणे यांचेमार्फत प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच, विषयांकित मिळकतीचा "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्मुलन आदेश ३(ड)"

दि.०५/०४/२००६ रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांचेमार्फत करणेत आलेला आहे ; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसूचीमधील क्षेत्र खाजगी मालकीचे असून या क्षेत्राचे विकसन हक्क विकसकाने प्राप्त केले आहेत; आणि

ज्याअर्थी, उपायुक्त पुणे महानगरपालिका, पुणे यांचे दि.०९/०६/२००५ रोजीचे आदेशान्वये मा.उच्चाधिकार समितीच्या बैठकीतील चर्चेनुसार विषयांकित मिळकतीवरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी विकसकाने पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या परवानगीअंती स.नं.२२४/२/१ पैकी, हडपसर, पुणे मध्ये स्थलांतरणासाठी पुनर्वसन इमारत बांधलेली आहे. तसेच, सदर स.नं.२२४/२/२ पै. खुल्या मिळकतीवर उर्वरीत पात्र झोपडीधारकांसाठी पुनर्वसन इमारत बांधणे नियोजित आहे. त्यानुषंगाने, सदर स.नं.२२४/२/१ पै. व स.नं.२२४/२/२ पै. या मिळकतीवर स.नं.२२६अ/१/१ पैकी या मिळकती वरील पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे प्रस्तावित असल्याने स.नं.२२४/२/१ पै.व स.नं.२२४/२/२ पै. या मिळकतीची झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पुर्वसूचना नोटीस प्रसिध्द करणे क्रमप्राप्त आहे. सदर दोन्ही मिळकतीची एकत्रित योजना (Composite Scheme) करावयाची असल्याने स.नं.२२६अ/१ पैकी तसेच, स.नं.२२४/२/१ पै.व स.नं.२२४/२/२ पै. या मिळकतींचा कलम ३क अंतर्गत संयुक्त झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेची पुर्वसूचना नोटीस प्रसिध्द करणेत आवश्यक आहे; आणि

सदर आदेशामुळे स.नं.२२६अ/१ या मिळकतीवर दि.०५/०४/२००६ रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांनी पारीत केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्मुलन आदेश या आदेशावर कोणताही परिणाम होणार नाही;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती यांना असे सूचित करीत आहे की, त्यांनी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना /आक्षेप/ हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले तसेच विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे

कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

उपरोक्त विहीत मुदतीत मालकी हक्क प्राप्त असलेल्या खाजगी व्यक्ती यांचेकडून प्राप्त आक्षेप / हरकती / सूचना / दावे यावर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबाबत व अधिसूचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव : कदम वस्ती, हडपसर**
**महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका**

| गाव | स.नं. | विकसन हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) पूर्णत: | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| हडपसर | स.नं.२२४/२/१ पैकी व स.नं.२२४/२/२ पैकी | विकसक मे.कुमार बेहरे राठी | २०१५.७२ चौ.मी. | पुर्वेस - स.नं.२२४ पै. | |
| | | | | पश्चिमेस - स.नं.३२१ पै. | |
| | | | | दक्षिणेस - लागु रस्ता व स.नं.२२४ पै. | |
| | | | | उत्तरेस - स.नं.३२१ पै. | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २१/०८/२०२०

21.8.2020

राजेंद्र निंबाळकर (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- रजि. पोस्ट द्वारे

१. जमिन मालक श्री.यशवंत मोरेश्वर परांजपे तर्फे कुलमुखत्याधारक मे.कुमार बेहरे राठी व विकसन हक्कधारक मे.कुमार बेहरे राठी, यांना माहितीस्तव.

२. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र १, झोपुप्रा पुणे यांना सूचित करण्यात येते कि या आदेशाच्या प्रती योजनाक्षेत्र / झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रसिद्धी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे

२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना गवनि विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
वरिल आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती

४. विकसक मे. कुमार बेहरे राठी, १० वा मजला, कुमार बिझनेस सेंटर, बंडगार्डन रोड, पुणे - ०१ यांना माहितीस्तव.